<u>**भुसंपादन अर्ज क्र. ३२/२०१९**</u>

## <u>निशाणी १९ वरील आदेश</u>

(दिनांक २३/१०/२०२१)

१. अर्ज व म्हणणे वाचले. जाबदार व अर्जदारतर्फे विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

२. जाबदार नं. १ ते ३ यांनी सदर दाव्याकामी मुदतीत म्हणणे न दिल्याने त्यांच्या विरुध्द 'म्हणणे नाही' आदेश झालेला आहे. कोरोना महामारीमुळे कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांना कोरोना ड्युटी लागल्यामुळे सदर जाबदार यांना याकामी मुदतीत म्हणणे देता आले नाही. त्यामुळे जाबदार नं. १ ते ३ यांच्या विरुध्द झालेला 'म्हणणे नाही' आदेश रद्द होऊन त्यांचे म्हणणे अभिलेखावर दाखल करुन घेण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे. प्रस्तुत अर्जावर अर्जदार यांनी नि.२० कडे म्हणणे दाखल करुन हरकत घेतलेली आहे.

३. प्रकरण पाहिले. उभय पक्षकारांच्या विधीज्ञांचे युक्तीवाद ऐकले. प्रकरणाचे स्वरुप व प्रकरणातील वस्तुस्थिती विचारात घेता, जाबदारांचे म्हणणे अभिलेखावर दाखल करुन न घेतल्यास त्यांचे अपरिमित नुकसान होणार आहे. याउलट, जाबदारांचे म्हणणे अभिलेखावर घेतल्यास प्रकरण गुणदोषावर निकाली होण्यास मदत होईल. सबब, पुढीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे;

# आ दे श

१. अर्ज मंजुर.

२. जाबदार नं. १ ते ३ यांच्या विरुध्द झालेला म्हणणे नाही आदेश रद्द करण्यात येतो व अर्जासोबत दाखल केलेले म्हणणे अभिलेखावर घेण्यात येते.

सही/-
(भूषण र. ठाकूर)
सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
इस्लामपूर.

दिनांकः- २३/१०/२०२१